# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निर्माल्य संकलन मोहिमेला पिंपरी चिंचवडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## सात दिवसांत जवळपास ५२ टन निर्माल्य संकलित; जलप्रदूषण रोखण्यास मोठी मदत





**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेने गणेशोत्सवाच्या अनुषंगाने शहरातील नदी, नाले व तलाव प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी राबवलेल्या निर्माल्य संकलन उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. शहरातील विविध भागांमध्ये १०३ ठिकाणी ठेवण्यात आलेल्या निर्माल्य कुंडांमध्ये गणेशोत्सव सुरू झाल्यापासून सात दिवसांत आज दुपारी १२ वाजेपर्यंत जवळपास ५२ टन निर्माल्य संकलित करण्यात आले होते. महापालिकेच्या आरोग्य विभागातून ही माहिती देण्यात आली.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली महापालिकेच्या आरोग्य विभागाने आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून निर्माल्य संकलनाची काटेकोर व्यवस्था केली आहे. या निर्माल्याचा कंपोस्ट व सेंद्रिय खत निर्मितीसाठी पुनर्वापर करण्यात येणार आहे.

नागरिकांनी निर्माल्य थेट नदी-नाल्यांमध्ये न टाकता महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या कुंडांमध्ये टाकल्यामुळे जलप्रदूषण रोखण्यास मोठी मदत होणार असून याबाबत व्यापक प्रमाणात स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी व स्वयंसेवक यांच्या मदतीने जनजागृती करण्यात येत आहे. पर्यावरणपूरक सण साजरा करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत असून नागरिकांकडून या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

---

पान १ वरून

## ९ गावांचा विकास आराखडा रखडला; नगररचनेकडून मुदतवाढीची मागणी

विकास आराखड्याचे काम पुढे सरकू शकले नाही. दरम्यान, सप्टेंबर २०२५ पर्यंतचा प्रारूप आराखडा तयार करण्यात विलंब झाल्याने राज्य सरकारने ऑगस्ट २०२४ मध्ये पालिकेचा तयार केलेला मसुदा आराखडा रद्द केला आणि आराखडा तयार करण्याचे अधिकार नगररचना विभागाला दिले. याच काळात फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन गावांसाठी स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्यात आली, त्यामुळे ती गावे या प्रक्रियेपासून वगळली गेली. सध्या नगररचना विभाग नऊ गावांचा नवीन विकास आराखडा तयार करत आहे. मात्र, हे काम अपेक्षित गतीने पूर्ण झालेले नसल्याने आणखी काही काळाची आवश्यकता आहे. त्यामुळे विभागाने राज्य शासनाला अधिकृतरीत्या मुदतवाढ मागितली असून, मंजुरी मिळाल्यानंतरच या गावांच्या विकासाचा मार्ग मोकळा होणार आहे. नगररचना विभागातील अधिकाऱ्यांच्या मते, येत्या काळात या गावांचा विकास आराखडा अंतिम स्वरूपात मांडला जाईल. पण पुन्हा मुदतवाढ मिळाली नाही, तर या गावांच्या विकास योजना आणखी लांबणीवर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## अवैध शस्त्रविरोधात पोलिसांची विशेष मोहीम; ५० पिस्तुलं आणि ७९ जिवंत काडतुसे जप्त

आळा बसवणे आणि पूर्व वैमनस्यातून होणाऱ्या गंभीर घटना टाळणे हा मुख्य उद्देश आहे.

**सोशल मीडियावरील गुन्हेगारांवरही कारवाई**

या मोहिमेदरम्यान सोशल मीडियावर रील्स आणि व्हिडिओद्वारे शस्त्रांचे प्रदर्शन करणाऱ्यांवरही पोलिसांनी धडक कारवाई केली. अशा व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. अटक करण्यात आलेल्या ४५ आरोपींपैकी तब्बल २५ जणांवर पूर्वीपासून गंभीर गुन्ह्यांच्या नोंदी आहेत.

**कारवाई सातत्याने सुरू राहणार**

या मोहिमेत गुन्हे शाखा युनिट चारने सर्वाधिक पिस्तुलं जप्त करून उल्लेखनीय कामगिरी केली असून त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याची घोषणाही पोलिस प्रशासनाने केली आहे. येणाऱ्या निवडणुकीदरम्यान अशा प्रकारची कारवाई अधिक कडक करण्यात येणार असून संशयास्पद हालचाली किंवा माहिती आढळल्यास नागरिकांनी तातडीने पोलिसांना कळवावे, असे आवाहन आयुक्त चौबे यांनी केले.

## आता सुशोभीकरणाच्या नावाखाली उधळपट्टी


असून, तो आता वापरात आला आहे. परंतु पुलाखालील रस्ता तातडीने दुरुस्त करणे आवश्यक असताना, पालिकेने रोषणाईसाठी निधी खर्च करण्याचा निर्णय घेतल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. या निर्णयावर टीका करताना शिवसेना (ठाकरे गट) खडकसवाला विभाग प्रमुख महेश पोकळे यांनी, पुलाखालील रस्ता उद्ध्वस्त असताना तिथे दीड कोटींची विद्युत रोषणाई करण्याचा निर्णय हा केवळ उधळपट्टीचा घाट आहे अशी टीका केली.

---

## गणेश विसर्जनावेळी युवक बुडाला

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात गणपती विसर्जनादरम्यान एक दुर्दैवी घटना घडली आहे. मुळशी परिसरात एका युवकाचा गणपती विसर्जनादरम्यान बुडला. मंगळवारी रात्री उशिरापर्यंत शोध सुरू होता, त्यानंतर आज सकाळपासून शोधकार्य सुरूच आहे. पण अद्याप तुरूणाचा शोध लागला नाही. लक्ष्मण चव्हाण असे बुडालेल्या तरूणाचे नाव आहे. तो मूळचा लातूरमधील उदगीर तालुक्यातील आहे. मुळा नदीच्या किनाऱ्यावर ही दुर्घटना घडली. मित्रांसोबत गणेश विसर्जनाला गेला होता, त्यावेळी ही दुर्घटना घडली.



मंगळवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास, पिरंगुट-हिंजवडी मार्गावरील भरे पूल येथे मुळा नदीच्या किनारी ही दुर्घटना घडली. लक्ष्मण हा एका खाजगी हॉस्पिटलमध्ये कर्मचारी म्हणून काम करतोय. विसर्जनासाठी मित्रांसोबत खोल पाण्यामध्ये गेला होता. त्या ठिकाणी पाण्यामध्ये त्यांनी डुबकी मारली, पण लक्ष्मण तसाच नदीच्या पात्रामध्ये वाहत खाली गेला.

लक्ष्मण मूळचा उदगीर तालुक्यातील असून सध्या तो पिरंगुट येथे राहत होता. त्याचा शोध आपत्ती व्यवस्थापन समितीने घेत असताना संध्याकाळ झाल्याने शोध थांबवण्यात आला. आज सकाळपासून या बुडलेल्या मुलाचा शोध घेतला जात आहे. अग्निशमन दल आपत्ती व्यवस्थापन ग्रामीण पोलीस तपास करत आहेत. काल पाण्याचा प्रवाह जोरात असल्याने तसेच रात्र झाल्याने शोध मोहीम थांबवण्यात आली आहे. बेपत्ता तरुणाचा आज सकाळी पुन्हा शोध घेतला जात आहे.

पुण्यामध्ये मंगळवारी सात दिवसांच्या गणपीतीचे विसर्जन झाले. पुणेकरांनी लाडक्या बाप्पााला जड अंत:करणाने निरोप दिला. गणरायाला निरोप देण्यासाठी गेलेल्या लक्ष्मण चव्हाण हा तरूण पाण्यात वाहून गेलाय. त्याचा शोध अद्याप सुरू आहे. गणेश विसर्जनावेळी काळजी घेण्याचे आवाहन पोलीस आणि प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## शेतकऱ्यांच्या मोटार व तांब्याच्या केबलची चोरी

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील पिंपरी दुमाला येथे शेतातील विहिरीवर बसवलेली पाणी पंप मोटार आणि तांब्याच्या केबलची मोठी चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्यांनी किर्लोस्कर कंपनीची ५ एचपी क्षमतेची मोटार आणि तब्बल १,०८० फूट लांबीची तांब्याची वायर असा सुमारे ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

या प्रकरणी श्रीकृष्ण विष्णू सोनवणे (रा. पिंपरी दुमाला) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. सोनवणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, १ सप्टेंबर रोजी सायंकाळी नेहमीप्रमाणे मोटार बंद करून ते घरी गेले होते. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी मोटार सुरू करण्यासाठी शेतात गेले असता चोरी झाल्याचे स्पष्ट झाले.

चौकशीदरम्यान गावातील इतर शेतकऱ्यांच्याही विहिरींमधून तांब्याच्या केबलची चोरी झाल्याचे समोर आले आहे. गेल्या काही दिवसांत वारंवार होणाऱ्या या साखळी चोऱ्यांमुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी शेतांमध्ये संशयास्पद हालचाली होत असल्याची चिंता शेतकरी व्यक्त करत आहेत.





## झेबा शेल्टर्स सोसायटीत पहाटे भीषण आग

### ४६ रहिवासी सुखरूप बाहेर, कोणतीही जीवितहानी नाही

**पुणे । प्रतिनिधी**

गुरुवार पेठेतील झेबा शेल्टर्स सोसायटीत बुधवारी (३ सप्टेंबर) पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास मोठी आग लागली. तळमजल्यावर असलेल्या वीजमीटर आणि दुचाकींना आग लागल्याने काही क्षणांतच इमारतीत दाट धूर पसरला आणि रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घाबरलेल्या नागरिकांनी तत्काळ अग्निशमन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधला. अलर्ट मिळताच जवानांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पाण्याचा मारा करून अवघ्या १० ते १५ मिनिटांत आगीवर नियंत्रण मिळवले. धुरामुळे श्वसनाचा त्रास होऊ नये म्हणून अग्निशमन दलाने धाडस दाखवत सोसायटीतील तब्बल ४६ रहिवाशांना सुरक्षित बाहेर काढले. त्यांच्या वेळीच केलेल्या कारवाईमुळे मोठी दुर्घटना टळली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र काही दुचाकी व वीज मीटर आगीत जळून नुकसान झाले आहे.

आगीचे कारण शॉर्टसर्किट असावे, अशी प्राथमिक शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या कारवाईत अधिकारी प्रशांत गायकर यांच्या मार्गदर्शनाखाली जवान अतुल मोहिते, अजिम शेख, सुधीर नवले, तेजस पटेल, सागर शिर्के आणि यश वीरकर यांनी पराक्रम गाजवला. घटनेनंतर खडक पोलिसांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

---

## सांगवीत पोलीस हवालदारासह दोघांकडून देशी पिस्तूल व जिवंत काडतुसे जप्त

**चिंचवड । प्रतिनिधी**

सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शनी मंदिरासमोरील मैदानात पोलिसांनी कारवाई करताना बेकायदेशीर देशी बनावटीचे पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. या प्रकरणी पोलीस हवालदारासह दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.१० वाजता सांगवी येथे ही कारवाई करण्यात आली. या वेळी आशिष ज्ञानदेव बनकर (३८, पोलीस हवालदार, सांगवी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड) आणि प्रभु विनोद भोसले (२७, रा. दांगट बस्ती, साडेसतरा नळी, हडपसर) हे संशयित सापडले. त्यांच्या ताब्यातून ३० हजार रुपये किंमतीचे देशी पिस्तूल आणि १ हजार रुपये किंमतीची दोन जिवंत काडतुसे मिळून आली.

पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयाने जारी केलेल्या मनाई आदेशाचा भंग करून संशयितांनी हे घातक हत्यार जवळ बाळगले असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सी. के. ताकभाते करीत आहेत.

## भारत (बीएच) मालिकेमध्ये नोंदणीकृत वाहनांचा कर भरण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय यांच्या २६ ऑगस्ट २०२१ रोजीच्या अधिसूचनेनुसार भारत (बीएच) मालिकेमध्ये नोंदणीकृत वाहनांचा कर वेळेत भरुन वाहनमालकांनी दंड टाळावा,असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी केले आहे.

भारत (बीएच) मालिकेमध्ये वाहने नोंदणीकृत करण्यासाठी दोन वर्षांसाठी कर घेतला जातो. तसेच वाहनांचा कर वैध असल्याच्या कालावधीचा शेवटचा दिवस पूर्ण झाल्याच्या ७दिवसानंतर प्रतिदिन १०० रुपये इतका दंड आकारला आकारण्यात येणार आहे, असेही प्रसिद्धीपत्रकान्वये श्री. भोसले यांनी कळविले आहे.

## एसटी महामंडळाच्या ताब्यातील अतिरिक्त जमिनींचा त्वरित वापर करण्यास मान्यता : परिवहन मंत्री, प्रताप सरनाईक

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी. महामंडळ) ताब्यातील अतिरिक्त जमिनींच्या व्यापारी तत्त्वावर वापरासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सार्वजनिक -खाजगी भागिदारीतुन विकसित होणाऱ्या प्रकल्पाच्या भाडेपट्टीची मुदत ही ६० वर्षावरून ९८ वर्षापर्यंत वाढवण्यात आली आहे.

**नव्या प्रकल्पांना चालना**

**या निर्णयामुळे महामंडळाच्या ताब्यातील निष्क्रिय जमीन उपयुक्त वापरात आणली जाईल, नव्या प्रकल्पांना चालना मिळेल तसेच एस.टी. महामंडळाला मोठा आर्थिक फायदा होऊन प्रवाशांना दर्जेदार सेवा पुरविण्यास मदत होईल.**

यामुळे एस.टी. महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक स्थैर्य साधण्यास मदत होणार आहे, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, सरकारच्या सुधारित धोरणानुसार, एसटी कडील अतिरिक्त जमिनींचा विकास सार्वजनिक-खाजगी सहभाग (झझझ) पद्धतीने करण्यात येणार असून त्यासाठीची भाडेपट्टा कालमर्यादा ४९ वर्षे + ४९ वर्षे अशी एकूण ९८ वर्षे इतकी असेल. या कालावधीत संबंधित जमिनींचा व्यापारी वापर करून मिळणाऱ्या उत्पन्नाचा / व्यापारी क्षेत्राचा ठराविक हिस्सा एसटी महामंडळाला जमा करणे बंधनकारक असेल.

तसेच, मुंबई महानगरातील एसटीच्या जागांचा विकास आर्थिक दृष्ट्या फायदेशीर करण्यासाठी आणि महामंडळाच्या शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी डी.सी.पी.आर.-२०३४ व यु. डी. सी. पी. आर.- २०२० नुसार व्यापारी वापरास परवानगी दिली जाणार आहे.

## निलंबित पोलिस निरीक्षक नागरगोजे यांचा मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

निलंबित माजी पोलिस निरीक्षक सुनील नागरगोजे यांनी अंबाजोगाईतील भाड्याच्या राहत्या घरात गळफास घेत जीवन संपवल्याची घटना सोमवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेने बीडसह अंबाजोगाईत खळबळ उडाली आहे.

नागरगोजे हे मूळचे परळी तालुक्यातील नागदरा गावचे असून अनेक वर्षांपासून कुटुंबासह अंबाजोगाईत राहत होते. त्यांनी परभणी, लातूर आणि बीड येथे पोलिस सेवेत काम पाहिले होते. लातूरमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख म्हणून त्यांनी काम पाहिले होते. परभणी येथे एका वरिष्ठ अधिकाऱ्याला शिवीगाळ केल्याचा प्रकार घडल्याने त्यांच्यावर चौकशी सुरू झाली होती. बीड येथेही एका कर्मचाऱ्याला धमकी दिल्याची तक्रार होती.

याच प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर एप्रिल २०२५ मध्ये त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. त्यानंतर ते नैराश्यात असल्याचे सांगितले जाते. कुटुंबीय मुलांच्या शिक्षणासाठी पुण्यात वास्तव्यास असल्याने नागरगोजे हे अंबाजोगाईत एकटेच राहत होते. घराचे बांधकाम सुरू असल्याने ते सध्या भाड्याच्या घरात होते. सोमवारी रात्री आठ वाजता त्यांनी घरात गळफास घेतल्याचे समोर आले.

---

## गणपती सजावटीला लागलेल्या आगीत ७० वर्षीय महिला थोडक्यात बचावल्या

**पुणे । प्रतिनिधी**

कॅनल रोडवरील सुंदर संस्कृती सोसायटीत मंगळवारी (२ सप्टेंबर) रात्री उशिरा आग लागल्याची घटना घडली. गणपतीसमोरील दिव्याच्या ज्योतीमुळे सजावटीच्या साहित्याला आग लागून हॉलमध्ये दाट धूर पसरला. या आगीत घरातील ७० वर्षीय महिला अडकल्या होत्या; मात्र स्थानिक नागरिकांच्या तत्परतेमुळे त्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आणि मोठा अनर्थ टळला.



नवले अग्निशमन केंद्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, रात्री ९.१८ वाजता घटनेची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी रवाना झाले. रात्री १० वाजण्याच्या सुमारास जवान सुंदर संस्कृती सोसायटी, बी२ मार्ट, कॅनल रोड येथे पोहोचले. फ्लॅट क्रमांक डी-२/१००३ या दहाव्या मजल्यावरील हॉलमध्ये सजावटीच्या वस्तूंना लागलेल्या आगीमुळे घरात धुराचे प्रमाण वाढले होते.

तोपर्यंत स्थानिक नागरिकांनी दरवाजा उघडून आत अडकलेल्या कुमुद बरसावले (वय ७०) यांना सुरक्षित बाहेर काढले. त्यानंतर सोसायटीच्या फिक्स फायर सिस्टीमद्वारे आग अंशतः विझवण्यात आली. अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचून कुलिंग ऑपरेशन करून परिस्थिती पूर्णतः नियंत्रणात आणली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

या कारवाईत ड्रायव्हर नरेश पांगारे, भाऊ गोगावले, नितीन भोवड आणि आकाश शिंदे यांनी सहभाग घेतला. पुढील धोका टळावा म्हणून दलाने घरमालकांना आवश्यक सूचना दिल्यानंतर घटनास्थळ सोडले.

## रासायनिक दूषित पाणी सोडल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

महाळुंगे (ता. खेड) परिसरातील एच. पी. चौकात हॉटेल कोर्टवार्डच्या मागील बाजूस विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानाजवळील मोकळ्या जागेत रासायनिक दूषित पाणी अनधिकृतपणे सोडल्याप्रकरणी पर्यावरण संरक्षण अधिनियम आणि पाणी प्रदूषण प्रतिबंध कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित जागेत नियमबाह्यरीत्या दूषित पाणी सोडले जात असल्याने स्थानिक नागरिक त्रस्त झाले होते. याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी पाहणी केली असता पर्यावरणाला हानी पोहोचेल अशा प्रकारे रसायनमिश्रित पाणी सोडण्यात आल्याचे स्पष्ट झाले.

याप्रकरणी महाळुंगे एमआयडीसी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३२५, २७९, २७१, २८० तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ७, ८, १५, १६, २४ आणि पाणी (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९७४ चे कलम २४, ४३ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास महाळुंगे एमआयडीसी पोलिसांकडून सुरू आहे.

## तरुणावर जीवघेणा हल्ला; दोन अटक

**पुणे । प्रतिनिधी**

लक्ष्मी रोड परिसरात मध्यरात्री एका तरुणावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली असून दोन आरोपी फरार आहेत. २ सप्टेंबर रोजी पहाटे दोनच्या सुमारास सिटी चर्चसमोर क्वॉर्टर गेट चौकात हा प्रकार घडला. हल्लेखोरांनी २१ वर्षीय तरुण व त्याच्या मित्राला थांबवून जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने हत्याराने मारहाण केली. यात दोघेही गंभीर जखमी झाले. या प्रकरणी आकाश रविंद्र उणेजा (२३, रा. मार्केटयार्ड) व चैतन्य विजय कवडे (२३, रा. कोंढवा) यांना पोलिसांनी अटक केली आहे. तर आणखी दोन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.